# समर्थांचे जीवन कार्य





लेखक —

श्री. नी. र. वऱ्हाडपांडे

नवी दिल्ली.


मराठी इतिहास संशोधनाच्या प्रारंभीच्या काळांत असे एक मत प्रचलित होते की शिवाजी महाराजांच्या कार्याचे स्फूर्तिस्थान व तात्विक उद्‌गाते श्री रामदास स्वामी हे होते, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष स्वराज्यस्थापनेच्या उद्योगात देखील गुप्त संघटना निर्माण करून रामदास स्वामींनी सहाय्य केले. शिवसमर्थांच्या संबंधाच्या कांही वर्णनातून तर असा सूर निघतो की लहानसहान कोणतीही गोष्ट करायची झाली तरी शिवाजी महाराज रामदासांचा सल्ला घेत असत. किंबहुना शिवाजी महाराजांना स्वतंत्र अस्तित्वच नव्हते, ते केवळ रामदास स्वामींचे हस्तक होते, असे भासविण्यापर्यंत काही कथांची मजल गेली आहे

वरील प्रकाराविरुद्ध एक प्रकार गेल्या काही वर्षात सुरु झाला आहे. या प्रकारानुसार लेखन करणाऱ्यांचा खाक्या असा असतो की रामदास व इतर परमार्थमार्गी संत यांच्यात काहीच फरक नव्हता भक्ति व मोक्षसाधन या व्यतिरिक्त कशांतही रामदासांना रस नव्हता. देशाचे राज्ययंत्र कुणाच्या हातात आहे व कुणाच्या हातात असावे याची रामदासांनी कधीची उठाठेव केली नाही. मग शिवसमर्थ संबंधाबद्दल वस्तुस्थिती काय आहे? याचा विचार करण्यासाठीं शिवाजी महाराजांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या पार्श्वभूमीचा विचार केला पाहिजे.

## शिव कार्याची पार्श्वभूमि

शिवाजी महाराजांची मनोवृत्ति बनविण्यास दोन व्यक्ति कारणीभूत झाल्या. एक त्यांचे वडील शहाजी राजे व दुसरी त्यांची आई जिजाबाई. शहाजी हा इतिहासात नृपनिर्माता म्हणून प्रसिद्ध आहे. निजामशाहीतील एका अल्पवयी बालकाला मांडीवर घेऊन शहाजीनें मोठमोठ्या परकीय सत्तांशी झुंज घेतली. निजामशाहीचे रक्षण करताना त्यानें एकदा मोठ्या मोगल सैन्याचा पराभव केला. पुढे निरुपाय झाल्यावर विजापूर दरबारची नोकरी पत्करली. पण ही नोकरी बजावताना देखील दक्षिणेतील विजयनगरच्या साम्राज्याचे अवशेष नष्ट होऊ नयेत म्हणून काळजी घेतली. पुढे तंजावर प्रान्तीं नाममात्र विजापुरचे अंकित पण वस्तुत: स्वतंत्र असे राज्य स्थापित केले. तेथे विजयनगरच्या सम्राटांच्या धर्तीवर तो दरबार भरवीत असे. शहाजीच्या या उपक्रमांबद्दल संशय येऊनच विजापुर दरबारनें त्याला कैद केले. पुढे सुटका झाल्यावरदेखील "स्वराज्यवृद्धीकारणें तुम्हीं सुपुत्र निर्माण आहा" अशा तऱ्हेचे आशीर्वाद देऊन विश्वासु माणसे मदतीस पाठवून व इतर यथाशक्य प्रकारे शिवाजी महाराजांच्या उपक्रमास साहाय्य केले.

सारांश शहाजी व्यवहार्य अशा सर्व मार्गांनी स्वजनांची सत्ता स्थापण्याचा प्रयत्न करीत होता हे निर्विवाद आहे. शिवाजी महाराजांच्या कार्याला आपल्या पराक्रमी पित्याच्या कार्याची ही पार्श्वभूमि लाभली होती. अर्थात् त्यांचे कार्य आगापिच्छा नसलेले व अकस्मात् उद्‌भवलेले नव्हते.

पित्याप्रमाणेंच माता जिजाबाई देखील राजकीय स्वातंत्र्याचे विचार लहानपणापासून शिवाजीच्या मनात रुजवीत होती याबद्दल पुरावा उपलब्ध आहे. सिंहगड घेण्याची प्रेरणा जिजाबाईनें दिली शिवाजी पन्हाळगडावर अडकून राहिला असता स्वत:च सैन्यानिशी त्यांच्या सुटकेस जाण्यास ती सिद्ध झाली, पुढें शिवाजी आग्ऱ्यास गेल्यावर राज्याचा सर्व भार तिनेच सांभाळला. या सर्व गोष्टी वरुन जिजाबाई ही नुसतीच संसारी व घरगुती स्त्री नसून राजकारणी डोक्याची कर्तबगार स्त्री होती हे स्पष्ट होते.

शहाजी व जिजाबाई हे शिवाजीच्या कर्तृत्वाचे मूलस्रोत इतके उघड व अविवाद्य आहेत की त्याचें जनकत्व रामदासांना देऊ जाणे हास्यास्पद ठरावे. पण अशा अनुमानाची वस्तुत: काही गरज नाहीं शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून त्यांच्या जीवितकालातच लिहिल्या गेलेल्या शिवभारत या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या उद्योगाचा जो इतिहास आलेला आहे त्यांत रामदासांचा कुठेच उल्लेख नाही. रामदास हेच शिवाजीचे राजकीय जनक असते तर त्यांच्या चरित्रात रामदासांचा उल्लेख आला नसता हे सुतराम् अशक्य आहे.

रामदास हे शिवाजीचे राजकीय जनक नव्हते हे निर्विवाद असले तरी ते इतर सन्तांसारखे नुसते मोक्षमार्गी संत होते असे ठरत नाही. त्यांचे चरित्र व लेखन यांचा उडत उडत अभ्यास केला तरी ही गोष्ट स्पष्ट होते.

## रामदासांचा जीवनवृत्तांत

रामदास स्वामींचा जन्म शके १५३० चैत्र शुद्ध नवमीला झाला. त्यांचे वडील लहाणपणीच निवर्तले आईनें व मोठ्या भावानें लहानपणी त्यांचे लग्न ठरविले. पण रामदासांना लहानपणापासूनच संसाराबद्दल विरक्ति वाटत होती. बोहल्यावर सावधान हे शद्ब ऐकताच त्यांनी खाली उडी टाकली व ते नाहीसे झाले. नंतर ते टाकळी येथें आले तेथे त्यांनी बारा वर्ष पुरश्चरण करून ईश्वरदर्शन करून घेतले असे म्हणतात. पण ईश्वरदर्शन झाल्यावर जीविताची इतिकर्तव्यता झाली असे न मानता रामदासांनी ईश्वरदर्शन हा आपल्या जीवितकार्याचा प्रारंभ मानला. देशाची सेवा योग्य रीतीनें करता येण्यासाठी ईश्वराचे ज्ञान पुरे पडणार नाही, त्यासाठी देशस्थितीचे ज्ञान आवश्यक आहे व हे ज्ञान करून घेण्यास साऱ्या देशाचे अवलोकन करणें आवश्यक आहे, अंतरंगांत दृष्टी वळवून आत्म्याचे दर्शन केल्यानें काम भागणार नाही हे समर्थांनी ओळखले व साऱ्या देशभर प्रवास केला. उत्तर–दक्षिण व पूर्व – पश्चिम असा सारा भारत त्यांनी पायाखाली घातला. एकूण १०२९ गावांना भेट दिली. या साऱ्या प्रवासाचा वृत्तान्त त्यांनी लिहून ठेवला आहे. समर्थांचे हे लेखन तत्कालीन भारतवर्षाची स्थिति समजून घेण्यास एक अव्वल दर्जाचे ऐतिहासिक साधन आहे. खालील उतारे पहा

पदार्थ तितुका गेला । नुसता देशची उरला ।
येणे करिता बहुताला । संकट जाले ।।
माणसा खावया अन्न नाही । आंथरूण-पांघरूण तेही नाही ।।
घर कराया सामग्री नाही । काय करिती ।।
भिक्षा मागता मिळेना । अवघे भिकारीच जना
देश नासला नासला उठ तोचि कुटी ।
पिके होताचि होताचि होते लुटालुटी ।।
काही चालेना उदीम व्यापार ।।
येक पळाले पळाले दूर देशा गेले
बहु कष्टले कष्टले तेथ नागवले ।
फिरोनि आलेरे आलेरे घरीचे लोक मेले ।
किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती,
किती मोट बांधून ते बूडवीती ।
राज्य नेले म्लेच्छक्षेत्री .. आपण अरत्री ना परत्री,
काहीच नाही ।।

वरील लांब अवतरण अनेक दृष्टींनी उद्बोधक आहे. मोगल काल हा आर्थिक दृष्टद्या समृद्धीचा व सुव्यवस्थेचा काळ होता असा आजकाल प्रचार करण्यांत येतो. रामदासांनी देशस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून वर जो वृत्तान्त लिहिलेला आहे त्यावरून हा प्रचार किती धादान्त खोटा आहे हे स्पष्ट होते सारेच भिकारी झाले होते मग कोण कोणाला भीक देणार ! उभी पिके कापली जात होती, देशात सर्वत्र लुटारूंचे साम्राज्य होते, स्त्रिया प्रत्यही पळविल्या जात होत्या. न्याय देणारी सत्ता कुठेच दिसत नव्हती. एकाद्या प्रांताचीच अशी वाईट स्थिति असेल असे समजून दुसऱ्या प्रांती जावे तर तेथेही तीच स्थिति ! तेथून स्वप्रांती यावे तर सर्व आप्तेष्ट देशोधडीला लागलेले !

रामदासांनी रेखाटलेल्या मोगलकालीन भारताचे हे चित्र यथार्थ आहे असे दुसऱ्याही पुराव्यावरून म्हणता येते. मोगल राज्यकर्त्यांनी हिंदूंच्या स्त्रिया पळवून नेण्यासाठी सरकारी खाती काढली होती असे जदुनाथ सरकारांसारख्या पारतंत्र्यपूजक लेखकालादेखील कबूल करावे लागले आहे. शिवाजी महाराजांनी देखील औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रात तुमच्या राज्यात ज्याला दोन वेळां जेवायला मिळते तो श्रीमंत समजला जातो असा आरोप केलेला आहे.

सारांश, प्रजेची लूट व हिन्दु मंदिरांचा विध्वंस या भांडवलावर मोगलांनी बांधलेल्या भपकेबाज इमारतींच्या आधारावर मोगलकालीन भारत वैभवशाली होता हे थोतांड पसरविण्यांत आले आहे.

## दारुण निराशा

रामदासांना केवळ देशाची आर्थिक विपन्नावस्थाच दिसली असे नसून "राज्य नेले म्लेच्छक्षेत्री" या शद्बांत त्यांनी राजकीय विपन्नावस्थेचे चित्र देखील रेखाटले आहे.

रामदासांच्या पूर्वी नामदेवांनी देखील तीर्थयात्रा केली होती. पण नामदेवांच्या लिखाणांत देशाच्या आर्थिक व राजकीय स्थितीसंबंधानें तिडिक कोठेही आढळत नाही. इतर संतांना नसलेली दृष्टी रामदासांना होती हे यावरून स्पष्ट आहे.

ही तिडिक नुसते नक्राश्रु गाळण्याइतकी वरवरची नसून इतकी पराकोटीची होती की देशाची दुर्दशा त्यांना पाहवेना. ही दुर्दशा सुधारण्याचे सामर्थ्य आपल्यांत नाही या विचाराने ते इतके कष्टी झाले की असे उच्छाद पाहण्यापेक्षा जीव दिलेला बरा, असे त्यांना वाटू लागले.

काय वाचोनी वा वोनी नें परते जीवित्व
किती धरावें धरावे ते सत्व ।

सर्वत्र निराशेनें ग्रासून हिमालयाच्या परिसरात देहत्याग करण्याची इच्छा त्यांना होऊ लागली. पण त्यांचे उपास्य दैवत श्री रामचंद्र यांच्या चिंतनानें त्यांना पुन: आशेचे किरण दिसू लागले व आत्महत्या करण्याचा बेत त्यांनी रहित केला.

देशाची दैन्यावस्था दूर व्हावयाची असेल तर स्वराज्य स्थापन झालें पाहिजे असे आता रामदासांना वाटू लागले. परशुरामाचे स्तवन करताना ते म्हणतात :–

किती एक मागें बहु युद्ध केलें । किती वेळ-या ब्राह्मणा
राज्य दिल्हे । अकस्मात सामर्थ्य ते काय झाले ?

## स्वराज्याचा ध्यास ...

देशाची स्थिती सुधारायची असेल तर स्वराज्य स्थापन झाले पाहिजे हे रामदासांनी ओळखले असले तरी परसत्तेशी सशस्त्र लढा देऊन स्वराज्य स्थापन करणें हे त्यांच्या कार्य–क्षेत्रात बसत नव्हते. त्याची भूमिका उपदेशकाची होती. सर्व-स्वाचा नाश होण्याच्या आधी बुद्धीला नाश व्हावा लागतो असे म्हणतात. ते राष्ट्राच्या विपन्नावस्थेचा विचार करतांना स्पष्टपणे प्रत्ययास येते, विपन्न राष्ट्राला विचार करायला शिकविणे सुतराम् आवश्यक असते. समर्थांनी हे ओळखून आपल्या प्रचारक यांला प्रारंभ केला. परलोकी डोळे लावून बसलेल्या व इहलोकाच्या जीवनाबद्दल काही आशा न बाळगणाऱ्या समाजाला प्रपंचात रस घेण्याची सवय लावणें आवश्यक होते. समर्थांचे स्वत:चे तत्वज्ञान परलोकवादीच होते त्यामुळें सर्वस्वी एहिकवादाची भूमिका त्यांना घेता येणे शक्य नव्हते पण स्वत:च्या तत्व–ज्ञानात बसेल अशा रीतीनें त्यांनी प्रपंचाचे महत्व विशद करून सांगितले आहे.

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका ।
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ।
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला परमार्थ कैचा ?

एकूण प्रपंच सोडून परमार्थ कांहीं थोडया अधिकारी लोकांचा मार्ग आहे. सर्वसाधारण माणसांनी उत्तम प्रपंच करून आपली योग्यता सिद्ध करावी व मग परमार्थाच्या फंदात पडावे.

प्रपंचाचे महत्व वर्णन करून सांगतांनाच "जन आणि जनार्दन वासी नाही भिन्नपण" असा समाजाभिमुखतेचा संदेश समर्थांनी दिला आहे. ऐहिक उत्कर्षासाठी आवश्यक अशा प्रयत्नवादाचा संदेशही समर्थांनी प्रभावीपणे दिलेला आहे.

केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा अन्तरी धरिता बरे ।।

## जातीय आक्षेप....

समर्थांनी परशुरामापुढे ब्राह्मणास राज्य मिळवून देण्या-साठी गळ घातली व ब्राह्मण्यरक्षणावर जोर दिला यावरून समर्थ हे जातीय दृष्टीचे होते असा कधी कधी प्रचार कर–ण्यांत येतो. हीच विचारपद्धती पुढे चालवली तर स्वत: शिवाजी महाराज गोब्राह्मणप्रतिपालक म्हणवून घेण्यांत भूषण मानीत यावरून तेही जातीय वृत्तीचें होते असा विपर्यास करता येईल. हजारो वर्षां पासून ब्राह्मण हे समाजाचे नेतें व समा–जाचा मानबिंदु म्हणून मानण्यात आलेले आहेत. ही आपल्याच समाजाची धारणा होती असे नव्हे परकीय आक्रमकांनी देखील ही गोष्ट ओळखली होती व भारतीय समाजाला नामोहरम करायचे असेल तर ब्राह्मणांचा नि:पात केला पाहिजे, निदान त्यांचे समाजावरील वजन नष्ट केले पाहिजे या उद्देशाने अले-क्झांडरपासून तो Verdict on India लिहिणाऱ्या भारतनिंद-कापर्यंत सर्व भारताच्या हितशत्रूंचे प्रयत्न सुरू होते. आजच्या भारतीय समाजाला ब्राह्मणाचे नेतृत्व नको असेल. पण शिव-कालीन भारतीय समाज ब्राह्मणांना आपले नेते मानीत असे. अशा समाजांत उपदेश करतांना समर्थांनी ब्राह्मणांनी ब्राह्म–ण्याचे रक्षण करावे म्हणजे आपल्या नेतेपणाला साजेल असे वर्तन करावे असा उपदेश केला तर तेवढ्यावरून त्यांना जातीय ठरवणारे स्वत:च्याच दुर्गुणांचा आरोप रामदासावर करीत आहेत हे स्पष्ट आहे.

रामदासांनी ब्राह्मण्याच्या रक्षणाची काळजी वाहिली तशीच क्षात्रधर्माचीही महती गायिली. ही महती गाताना त्यांनी जे उद्गार काढले आहेत त्यांत कोणत्याही उद्देशासाठीं का होईना, लढणे म्हणजे क्षात्रधर्म अशी कल्पना नाही. क्षात्र-धर्म म्हणजे देवधर्मासाठी लढणें पगार मिळतो म्हणून वाटेल त्या सत्तेसाठी लढणे हा क्षात्रधर्म नसून श्वानधर्म आहे ही भावना समर्थांच्या विवेचनांत गर्भित आहे.

देवद्रोही तितुके कुते मारून घालावे परते ।
देवदास पावती फत्ते यदर्थी संदेह नाही ।।
देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवा का बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ।।

## मठ स्थापना....

रामदासांनी केवळ भक्तीचा व परमार्थाचाच उपदेश केला नसून राष्ट्रजागृतीचाही उपदेश केला याबद्दल आता कुणाला शंका राहिली नसेल. रामदास अशा तऱ्हेचा वैयक्तिक उपदेश करूनच थांबले नाहींत तर त्यानी हा उपदेश भारताच्या काना-कोपऱ्यात पोचावा व हिंदुधर्माला संघटित स्वरूप यावें म्हणून एक भारतव्यापी संघटना उभारली, ही संघटना म्हणजे काशी-पासून द्वारकेपर्यंत व श्रीरंगपट्टणापासून प्रयागपर्यन्त त्यांनी स्थापलेलें मठ होत. या मठांचे प्रमुख रामदासांच्या तालमीत तयार झालेलें व त्यांच्या विचारांच्या प्रसारासाठी आजन्म स्वतःस वाहून घेतलेले असे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांच्या अनुयायांची संख्या हजारोंच्या घरात जाणारी होती. त्यांच्या उद्धव नावाच्या एका शिष्यानें तेलंगणातून ७०० कार्यकर्ते समर्थांच्या भेटी साठीं आणले होतें असा उल्लेख सापडतो. अयोध्येच्या राममन्दिरावर औरंगजेबानें हल्ला केला तेव्हा त्याच्या प्रतिकारासाठी जे १०००० गोसावी लढले ते समर्थांचे शिष्य होते असे काही लेखकांचे म्हणणें आहे.

## रामदासांचे राजकारण

रामदासांच्या दृष्टिकोनात राजकारणाला असलेले महत्व समर्थांचें लिखाण वाचणाऱ्या कुणालाही निःशंकपणें दिसण्या-सारखे आहें असे असून समर्थांचा राजकारणाशी काहीच संबंध नव्हता असे श्री. न. र. फाटकांसारखे लेखक आग्रहानें प्रति-पादन करीत आहेत. फाटकांच्या लिखाणाचा हेतु कुचेष्टा करून प्रतिष्ठा मिळविणें, महाराष्ट्रातील जातीय विद्वेषाचा अनुनय करून सवंग लोकप्रियता मिळविणे, ज्यामुळे वादाची धुळवड उडेल पण स्वतःची कातडी सुरक्षित राहिल अशा तऱ्हेच्या मतांचे प्रतिपादन करणें अशा तऱ्हेचा असतो. त्यामुळे त्यांच्या लिखाणाचा फारसा विचार करण्याचे वस्तुतः कारण नाही. पण काही लोकामध्ये त्यांनी इतिहासकार म्हणून प्रतिष्ठा मिळविलेली आहे म्हणून अनैतिहासिकतेची उदाहरणें देण्यासाठी का होईना पण त्यांच्या विवेचनाचा परामर्ष घ्यावा लागतो.

समर्थांनी राजकारण शद्ब अनेकवेळा वापरलेला आहे व राजकीय स्वरूपाचे अनेक विचार त्यांच्या लिखाणांत जागो-जागी आढळतात हे आतापर्यंत दाखवून दिलेच आहे. "मुख्य ते हरिकथा निरुपण । दुसरे तें राजकारण " हे समर्थांचे वाक्य प्रसिद्ध आहे. या संबंधी फाटकांचे म्हणणें असे की समर्थांच्या काळी राजकारण या शद्बाचा अर्थ चातुर्य असा होत असे. फाटकांची ही शुद्ध लोणकढी थाप आहे " राजकारणप्रसंगे कुतुबशहाच्या भेटीस्तव " आलो असा शिवाजी महाराजांच्या एका पत्रातच उल्लेख आहें. याचा " चातुर्यप्रसंगे कुतुबशहाच्या भेटीस्तव आलो " असा अर्थ करण्याचे धाष्टर्य फाटकांना झाले तरी प्रामाणिक इतिहासकाराला होणार नाही. बरे समर्थांच्या लिखाणात जेथे जेथ राजकारण हा शद्ब आलेला आहे तेथे तेथे चातुर्य असा शद्ब घातला तर काही अर्थबोध होतो काय ? मुळीच नाही ? वानगीदाखल खालील वाक्य पहा.

राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे । याचा अर्थ चातुर्य बहुत करावे परंतु कळोच नेदावे ?

ऐसे असो राजकारण । सांगता ते असाधारण ।
सुचित अस्ता अंतःकरण । राजकारण जाणे ।। म्हणजे ऐसे असो चातुर्य । सांगता ते असाधारण, सुचित अस्ता अंतःकरण । चातुर्य जाणे ?

कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ।। म्हणजे कट्ट घालून चातुर्या । लोक लावी ?

चातुर्य करावें पण कोणाला कळू देऊ नये, चातुर्याला लोक लावावे, वगैरे वाक्यें फाटकांच्या लिखाणात सामावून जाणारी असली तरी सुबुद्ध विधाने करण्याबद्दल कटाक्ष बाळगणाऱ्या कोणत्याही लेखकाच्या लिखाणात ती येऊ शकणार नाहीत.

समर्थांनी संभाजी राजांना लिहिलेल्या पत्रांत पुढील वाक्ये आहेत.

"कष्टे करून घसरावे म्लेच्छावरी"

"मऱ्हाष्ट राज्य करावे जिकडे तिकडे"

फाटकांच्या मते हे विचार राजकीय नसून हे नुसते चातुर्य आहे ! शिवाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात समर्थ म्हणतात –

तीर्थे क्षेत्रे ते मोडली । ब्राह्मणे स्थानभ्रष्ट झाली
सकळ पृथ्वी आन्दोळली, धर्म गेला
या भूमंडळाचे ठायी, धर्म रक्षी ऐसा नाही,
महाराष्ट्र धर्म राहिला काही, तुम्हाकारणे

परसत्तेमुळें धर्म नष्ट झाला, त्या सत्तेचा शिवाजीनें पराभव करून धर्म रक्षिला हे विधान राजकीय नव्हे बरे का ! ते नुसते चातुर्य आहे !

रामदासांचे लिखाण राजकीय विचारांनी भरलेले आहे, एवढेच नव्हे तर शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचालीत देखील ते लक्ष घालीत असत असे काही उल्लेखावरून म्हणता येते. आग्र्याला जातांना शिवाजी महाराजांनी रामदासांचा सल्ला घेतला असे चिटणीस बखरीत लिहिले आहे. बखरींचा पुरावा अव्वल दर्जाचा समजण्यांत येत नसला तरी रामदास शिवाजीच्या राजकारणांत सल्लामसलत देत असत ही समजूत अलिकडची नसून बरीच जुनी आहे हे तेवढ्यावरून खास सिद्ध होते.

शिवाजी महाराजांच्या एका सनदेत पुढील शब्द आहेत.

"तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना,... त्याजवरून जो जो उद्योग सुरू केला व दुष्ट तुरुख लोकांचा नाश करावा .. जे जे मनी धरले ते ते स्वामींनी आशीर्वादा-प्रमाणें मनोरथ पूर्ण केले."

रामदास स्वामींनी स्वराज्यस्थापनेचा उपदेश केला होता हे यावरून स्पष्ट आहे अर्थात स्वराज्य स्थापनेचा उद्योग हा केवळ या उपदेशाचेच फळ होय असे त्यावरून अनुमान काढणें साफ चुकीचे आहे हें सांगण्याची जरूर नाही.

शिवसमर्थांची भेट फार उशीरा झाली व म्हणून शिवाजी महाराजांच्या जीवनांत रामदासांचें महत्व फार नाही असा एक मुद्दा फाटकांनी उपस्थित केला आहे. शिवाजीच्या कार्याचे श्रेय रामदासांना देता येत नाही एवढेच म्हणावयाचे असेल तर हे सिद्ध करण्यास हा मुद्दा महत्त्वाचा आहे पण रामदासांनी राजकारणाचा विचार देखील केला नाही. इतर संतांसारखेच ते नुसते परमार्थी संत होते हा अतिरेकी सिद्धांत सिद्ध करण्यास त्याचा काहीही उपयोग होण्यासारखा नाही

सारांश भारतभ्रमण, देशस्थितीचें राजकीय दृष्टीनें अवलोकन, स्वराज्याकांक्षी प्रचार व भारतभर मठस्थापना हे रामदासांचे राजकीय कार्य निर्विवाद आहे. असे असता फाटकासारखे लेखक रामदासांचा व राजकारणाचा काहीच संबध नाही असे बेलाशक म्हणतात तेव्हा फाटकांचे लिखाण 'एकां लज्जां परित्यज्य त्रैलोक्यविजयी भवेत्' या वर्गांत मोडणारे आहे असे म्हणण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

आश्चर्याची गोष्ट अशी की ज्या ज्ञानेश्वरांच्या साऱ्या लिखाणात व जीवनात चुकूनसुद्धा राजकीय म्हणता येईल असे काहीही नाही व ज्यांचे सर्व लिखाण महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य कालात झाले, त्यांनो आपली ज्ञानेश्वरी मुस्लिम आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी लिहिला असे फाटक म्हणतात.

फाटकांचे लिखाण "घटं भिद्यात् पटं छिंद्यात् कुर्याद्वा रासभस्वरम् । येन केन् प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्" या जातीचे आहे याचे आणखी कोणते प्रत्यंतर पाहिजे.

### स्वप्न साकार झाले

फाटकांच्या लिखाणाची चव रेंगाळत असताना लेख संपविणें इष्ट नाही. रामदासांच्याच चिरंतन स्वप्नाचा आठवण करून तो संपवावी हे उचित आहे. रामदासांनी माझे स्वप्न साकार झाले, औरंग्या पापी बुडाला, मोडलेली क्षेत्रे पुन्हा मांडलो गेली म्हणून हर्षोन्माद व्यक्तविताना एक फारच महत्वाचा उद्‌गार काढला आहे. तो म्हणज 'हिंदुस्थान बळावले.' शिवाजोचा विजय हा साऱ्या भारताचा विजय आहे अशी त्यांची अखिल भारतीय धारणा होती. साऱ्या भारतभर मठ स्थापन करून अखिल भारत हेंच आपले कार्यक्षेत्र आहे हे त्यांनी दाखवून दिले होतेच. भारतीय एकत्वाची कल्पना ब्रिटिशांनीं निर्माण केली, त्यापूर्वी ती नव्हती असे म्हणणाऱ्या करंटचांनी रामदासांच्या स्वप्नचे मनन करावे. *

## साहित्य – स्वागत

### प्रा. सोनोपंत दांडेकर चरित्र

**प्रकाशक, लेखक : श्री. रा. गो. पाटील**

**पृष्टे – १३६ किंमत २ रुपये**

जीवनाचा सर्वांगीण विकास होण्याकरिता त्यात विशिष्ट अशा दैवी गुणांची वाढ होणे अवश्य असते. मानवीं जीवनाचें मूल्य अनेक प्रकारे तपासले जाते. नैतिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय अध्यात्मिक इत्यादि हीं जीवनमूल्यें बालवयातच निर्माण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

शिक्षणाचे प्रयोजन हचा जीवनमूल्यांची निर्मिती हेंच आहे विद्यापीठाने ठरवून दिलेला विशिष्ट अभ्यासक्रम संपविला एनकेनप्रकारेण उत्तीर्ण झाला म्हणजे जीवन स्वयंपूर्ण झाले असे नव्हे. ते स्वयंपूर्णत्व संपादन करण्याकरिता जीवनांत पावित्र्य, कर्तव्य, तत्परता, धैर्य, ओज इत्यादि गुणांचा विकास होणे इष्ट आहे ते होण्याकरिता आदर्शाची गरज असते.

असे आदर्श पुरुषच जीवनाचे निश्चित साध्य व त्याचे नियत साधन समाजास स्पष्टपणे तसेच आपल्या विशुद्ध आचरणाने पटवून देत असतात. मधूनमधून असे मार्गदर्शन करणारे थोर पुरुष अवतार घेऊन आपले कार्य करून जातात. समाजाकरिता सर्वस्वाचा त्याग करून समाजजीवनाच्या उत्कर्षाकरिता अहर्निश झटत असतात. आपल्या शुद्धाचरणाने, अलौकिक त्यागानें व श्रमाने संपादन केलेले ज्ञान समाजास मुक्त हस्ताने ते देत असतात. हाच तो जीवनाचा आदर्श आहे. त्यांच्या पावित्र्याचे तेज जगास आपल्याकडे ओढीत असते म्हणूनच बहुजन समाज तिकडे सहजच आकृष्ट होतो.

अशा आदर्श पुरुषापैकीच प्रस्तुत चरित्रनायक वै. श्री. ह. भ. प. शं. वा तथा सोनोपंत दांडेकर हे होत चरित्रकाराने विद्यार्थी दशेतील जे चरित्र श्री. सोनोपंत यांचे दिले आहे ते सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत आदराने आचरावे असे आहे. श्री सोनोपंत हे आजन्म विद्यार्थी व्रताने राहिले त्यांची ज्ञानलालसा दांडगी होती. प्रवासातही नवे नवे इंग्रजी, संस्कृत मराठी ग्रंथ त्यांच्याबरोबर ते आणीत असत विद्यार्थ्यांने आपल्या ज्ञानात आजन्म भर घालीत असावे असे ते सांगत असत विद्यार्थीदशेतील त्यांचे आचरण कसे शुद्ध होते हे या चरित्रावरून समजते. त्यांचे सर्व जीवन त्यागमय होते. अनेक प्रलोभनें प्राप्त झाली असताही त्यांनी ती सहज दूर केली. स्वतःला शिक्षणकार्यासाठी वाहून घेतले. भागवत धर्माचा प्रसार सर्व महाराष्ट्रभर हिंडून कीर्तन प्रवचनाद्वारे केला. चरित्र सुबोध व वाचनीय झाले आहे

**— ह. भ. प. धुंडा महाराज**